अपर पोलीस महासंचालक व संचालक कार्यालय,
पोलीस बिनतारीसंदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संकेतस्थळ : mahpolwireless.gov.in ईमेल : dirpolwireless.pune@nic.in
फॅक्स : (020) 25657974 दूरध्वनी : (020) 25652505

क्र.ई-04/पदोन्नती/पोहवा(वीतं) ते सपोउनि(वीतं)/2017/15414 पुणे, दिनांक : 31 / 08 /2017

विषय :- पोलीस बिनतारीसंदेश विभागातील पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांचे सहायक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) या पदावरील पदोन्नतीवर नेमणुकीबाबत.
**(निवड सुचीसन 2016-2017)**

--- 000 ---

**आदेश :-**

पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमुद पोलीस हवालदार(वीजतंत्री) यांना, कार्यभार ग्रहण केल्याच्या तारखेपासून, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) या पदावर स्थानापन्न व निव्वळ तातपुरत्या स्वरुपाची **(Provisional)** पदोन्नती देऊन, त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदोन्नतीवर नेमणूक देण्यात येत आहे.

पोलीस हवालदार (वीजतंत्री) :- वेतनश्रेणी रु.5200-20200/- अधिक श्रेणीवेतन रु.2400/-
सहायक पो.उपनिरीक्षक (वीजतंत्री) :- वेतनश्रेणी रु.5200-20200/- अधिक श्रेणीवेतन रु.2800/-

| अ. क्र. | पोलीस हवालदार(वीजतंत्री) यांचे नांव व जातीचा प्रवर्ग | सध्याची नेमणूक व आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणूकीचे ठिकाण व आस्थापना | पदोन्नती कोणत्या प्रवर्गातून | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री.सकलेन अ.अ.रजाक चौधरी **मुस्लिम (खुला)** | **पुणे शहर** पोलीस आयुक्त, पुणे शहर | **संशोधन व विकास** संचालक आस्थापना पुणे | **खुल्या प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| 02 | श्री.सुरेश सदाशिव पाटील **गुजर(इ.मा.व.)** | **जळगांव** पोलीस अधीक्षक, जळगांव | **ठाणेशहर** पोलीस आयुक्त, ठाणेशहर | **खुल्या प्रवर्गातून** | रिक्त पदावर |
| 03 | श्री.विठ्ठल शंकर कुराडे **मराठा (खुला)** | **रत्नागिरी** पोलीस अधीक्षक, रत्नागिरी | **मुंबई शहर** पोलीस आयुक्त, मुंबई शहर | **खुल्या प्रवर्गातून** | रिक्त पदावर |

2. सदरची पदोन्नती हीखालील अटीवशर्तीचे अधीन राहून देण्यात येत आहे.

01) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.8452/2004 मध्ये दिनांक 09/03/2007 रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक 28/03/2008 रोजी झालेल्या सुनावणी मध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या पदावरील सर्व पदोन्नत्या या मूळ याचिका क्र.8452/2004 च्या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. तसा स्पष्ट पदोन्नतीच्या आदेशामध्ये उल्लेख करण्यासंदर्भांत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/1/16-ब, दिनांक 01/04/2008 अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठापुढे दाखल केलेला मूळ अर्ज क्र.1180/2010 मध्ये मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

02) उपरोक्त पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला असेल/ निलंबनाची कार्यवाही केलेली असेल/ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असेल, ते एखादी शिक्षा भोगत असतील तर संबंधित घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांचे विरुद्धच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सद्वारे पाठवावी आणि पुढील आदेशाची वाट पाहावी.

03) उपरोक्त पदोन्नत कर्मचारी सध्या एखादी शिक्षा भोगत असतील अथवा देण्यात आलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही अशा कर्मचा-यांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगणेस तयार असल्याबाबत दिनांकीत स्वाक्षरी केलेले लेखी हमीपत्र घेऊन, सदर हमीपत्राच्या अधीन राहूनच पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच संबंधित कर्मचा-यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशातही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व संबंधितांच्या लेखी हमीपत्राची प्रत या कार्यालयास सादर

करावी. जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

04) पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यांना सदरची पदोन्नती स्वीकारण्याची इच्छा नाही अशा कर्मचा-यांचे लेखी अर्ज 7 दिवसांत या कार्यालयात सादर करण्याची संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

05) पदोन्नती आदेश प्राप्त झाल्यानंतर जे कर्मचारी पदोन्नती स्वीकारणार नाहीत किंवा विविध सबबी खाली पदस्थापना स्वीकारण्यास टाळाटाळ करतील त्यांना आश्वासित प्रगती योजनेंतर्गत देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील.

06) पदस्थापनेत बदल करण्याकरीता कोणत्याही स्वरुपाचा राजकिय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास ही बाब गंभीर ठरवून शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

07) पदोन्नतीनंतर संबंधित कर्मचारी पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास त्यांना पदोन्नतीबाबत स्वारस्य नसल्याचे समजून सामान्य प्रशासन विभागाच्या स्थायी आदेशानुसार निवडसूचीतून त्यांचे नाव वगळण्यात येईल. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांची विनंती मान्य करता येणार नाही.

08) जे कर्मचारी रजेवर/ गैरहजर/रुग्णनिवेदनात असतील, ते प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारलेल्या दिनांकापासून पदोन्नतीस पात्र राहतील.

09) सदरची पदोन्नतीवरील नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतूदीनुसार करण्यात येत आहे.

10) पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढीनंतर वेतननिश्चितीकरिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसूचनावित्त विभाग क्रमांक वेपूर 1298/ प्रक्र-13/98/सेवा-10 दि.10/12/1998 च्या आदेशाची माहिती सहा.पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यास द्यावी. असा विकल्प द्यावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत असा विकल्प द्यावा. मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व त्यांची वेतननिश्चिती म.ना.से. (वेतन ) नियम - 1981, नियम क्र.11(एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधितांस समज द्यावी.

11) कालबद्ध पदोन्नती घेतली असल्यास संबंधित कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही. संबंधित कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबद्ध पदोन्नती (वरिष्ठवेतनश्रेणी) काढून घेण्यात यावी आणि त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

12) उपरोक्त पदोन्नती झालेल्या पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांना पदोन्नतीवरील नियुक्तीच्या ठिकाणी **तात्काळ कार्यमुक्त करुन** त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक व सहायक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) या पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास उलट टपाली कळवावा.तसेच सदरील कर्मचारी हे पदोन्नतीवर बदली झालेले ठिकाणी या आदेशाचे तारखेनंतर एक महिन्याचे आत हजर न झाल्यास त्यांची सेवाज्येष्ठता ते पदोन्नतीवर हजर होतील त्या दिनांकापासून धरणेत येईल. तसेच संबंधित आस्थापना अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांच्या सेवापटामध्ये पदोन्नतीच्या आदेशाचा क्रमांक व दिनांकाची नोंद घ्यावी.

**3. पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस हवालदार (वीजतंत्री) यांचे आम्ही अभिनंदन करीत आहोत आणि पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा देत आहोत.**

**( रितेश कुमार )**
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,पुणे-08.

**प्रति**

पोलीस आयुक्त, मुंबई शहर / पुणे शहर / ठाणेशहर (यांना सस्नेह अग्रेषित)
पोलीस अधीक्षक, जळगांव/रत्नागिरी,
पोलीस अधीक्षक, बि.सं.,पश्चिम विभाग, पुणे. / पोलीस उप आयुक्त, बि.सं.वि.मुंबई.

**प्रत :** सहायक पोलीस आयुक्त बि.सं., पुणे शहर / ठाणेशहर
पोलीस उपअधीक्षक, बिसं.कोल्हापूर परिक्षेत्र /नाशिक परिक्षेत्र /कोकण परिक्षेत्र./ संशोधन व विकास, पुणे
पोलीस निरीक्षक,बि.सं.जळगांव/रत्नागिरी.

**स्थानिक प्रती :-**

प्रमुख लिपिक, लेखाशाखा/ आस्थापना शाखा - 02/ भरती कक्ष(संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी) /
"क" शाखा (राजपत्रकामध्ये प्रसिद्धीसाठी)